# ऋणनिर्देश

''एस. एल. भैरप्पा यांच्या 'पर्व' कादंबरीचा चिकित्सक अभ्यास'' हा लघुप्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल. पदवीसाठी सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. या अभ्यासासाठी ज्यांचे ज्यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले त्या सर्वांचे ऋण व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजते.

प्रस्तुत लघुप्रबंधाच्या अभ्यासासाठी मार्गदर्शक म्हणून मला आदरणीय गुरुवर्य डॉ. रवींद्र ठाकूर सर लाभले. यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजते. सरांनी वेळोवळी प्रस्तुत अभ्यासातील मला बारीक तपशील समजावून सांगितले. हा लघुप्रबंध अधिकाधिक अर्थपूर्ण व नेमका होण्यासाठी त्यांनी महत्त्वाच्या सूचना केल्या त्या मला अभ्यासात महत्त्वपूर्ण ठरल्या आहेत.

तसेच गुरूवर्य डॉ. विश्वनाथ शिंदे सर, डॉ. कृष्णा किरवले सर, डॉ. रणधीर शिंदे सर, हिमांशू स्मार्त सर यांनी मला मार्गदर्शन केले त्यामुळे मी त्यांची ऋणी आहे.

माझे गुरू प्रा. प्रकाश दुकळे सर व प्रा. महतेश हिरेमठ सर यांनीही मला मोलाचे मार्गदर्शन केले व प्रोत्साहनही दिले. तसेच डॉ. मनमोहन राजे सर यांचेही मला मार्गदर्शन मिळाले त्यांची मी ऋणी आहे.

या बरोबर माझ्या मित्रपरिवाराचेही मला मोठे सहाय्य मिळाले. त्यांच्याशी केलेली चर्चा ही मला अभ्यासासाठी महत्त्वपूर्ण ठरली त्या सर्व ज्ञात आणि अज्ञातांचे मी मन:पूर्वक आभारी आहे.

शेतामध्ये काम, उन्हातान्हाची तमा न बाळगता आणि मातीच्या गोळ्याला वेगवेगळे आकार देत, काबाडकष्ट करत माझ्या शिक्षणासाठी अविरत कष्ट सोसणारे माझे माई-आण्णा यांचे प्रोत्साहन मिळाले. त्यांचे हे ऋण मी कधीही विसरू शकणार नाही.

कुंभार प्रियंका शंकर